# धर्मप्रांतीय उपासना आयोग, वसई

## सामान्य काळातील पाचवा रविवार

## ०९ फेब्रुवारी २०२५

## श्रद्धावंतांच्या प्रार्थना

धर्मगुरू ः बंधू आणि भगिनीं म्हणून ख्रिस्ताठायी आपण एकत्र जमलो आहोत. प्रभूने आपल्यावर केलेल्या अनेक उपकारांची आपण आठवण करू या. प्रार्थना करण्यास परमेश्वर आपल्याला स्फूर्ती देतो. आमच्या प्रार्थना स्वीकारण्यास आपण त्याला विनंती करू या.

प्रतिसाद ः **प्रभो, आमची प्रार्थना ऐक.**

१. आपले पोप फ्रान्सिस, बिशप थॉमस, धर्मगुरू व व्रतस्थ ह्यांना ख्रिस्ताच्या प्रकाशात चालण्यासाठी परमेश्वराची कृपा व चांगल्या आरोग्याची देणगी लाभावी, **म्हणून आपण प्रार्थना करू या.**

२. आपल्या देशातील संपत्तीचा सद्‌पयोग देशहितासाठी व जनकल्याणासाठी करण्यास राजकीय व शासकीय नेत्यांना सतत प्रेरणा मिळावी, **म्हणून आपण प्रार्थना करू या.**

३. प्रभूच्या आज्ञेवरून शिमोनने जाळे समुद्रात टाकले व माशांचा मोठा घोळका जाळयात सापडला. माणसे धरणारे होण्यासाठी त्यांनी सर्व काही सोडून प्रभूचा माग स्वीकारला. प्रभूच्या तारणदायी प्रकाशाने आपणास इतरांचे जीवन प्रकाशमय करण्यास कृपा मिळावी, **म्हणून आपण प्रार्थना करू या.**

४. आपण पात्र नसतानाही परमेश्वर आपल्यावर अनेक मार्गाने जबाबदारीची कामे सोपवीत असतो आणि ती कामं पूर्ण करीत असताना आपले जीवन सर्वस्वी बदलून जाते. प्रभूच्या ह्या औदार्यावर आपल्याला पूर्ण पणे विसंबून राहाता यावे, **म्हणून आपण प्रार्थना करू या.**

५. प्रभूच्या सामर्थ्यशाली कृपेने आपल्याला चांगल्या आरोग्याची देणगी लाभावी, दु:खितांना व शोकग्रस्तांना दिलासा प्राप्त व्हावा, अखिल जगात शांती नांदावी, उद्या / आज विवाहबद्ध होणा-या वधूवरांवर परमेश्वराचा आशीर्वाद यावा तसेच सर्व नैसर्गिक आपत्तीपासून आपले रक्षण व्हावे, **म्हणून आपण प्रार्थना करू या.**

थोडावेळ शांत राहून आपण आपल्या वैयक्तिक हेतूंसाठी प्रार्थना करू या.

धर्मगुरू ः हे स्वर्गीय पित्या, तुझ्या ख्रिस्तसभेच्या प्रार्थना ऐक. आमच्या श्रद्धेमधील उणिवा तुझ्या प्रेमाने भरून काढ. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभूख्रिस्ताद्वारे करतो. आमेन.